विकल्प संगम प्रक्रियेत चर्चेसाठीचा चौथा मसुदा......                    संवादाकरिताचे टिपण

# पर्यायांचा शोध... कळीचे पैलू आणि तत्व.

विकल्प संगम प्रक्रियेचा भाग म्हणून,आज प्रचलित/प्रभावशाली आर्थिक व राजकीय व्यवस्थेला "मूलभूत पर्याय ठरु शकतील",अशा चौकटींचा आणि दृष्टी अथवा स्वप्नांचा,आपण सामुहीकपणे शोध घेऊ शकू का?सध्याच्या कल्पन्नांचा,दृष्टींचा-स्वप्नांचा आणि संस्कृतींचा वारसा तसेच पूर्वीच्या किंवा नव्या तळागाळातील समुहांच्या रीती यांच्या शिदोरीवर अशा चौकटींची आणि दृष्टीची रचना कशी होऊ शकेल? ..या दृष्टीने काही विचार मांडण्याचा प्रयत्न या टिपणात केलेला आहे.आपल्यातील संवाद आणि अशी दृष्टी विकसित करण्याला उत्तेजन देण्याच एक साधन म्हणून हे टिपण वापरु शकू.

आजच्या प्रचलित/प्रभावशाली व्यवस्थेवरील टीकेचा यात समावेश केलेला नाही.आपली याबाबतीत काही किमान समान समज गृहीत धरलेली आहे. पर्यावरणीय अस्थिरता,समतेचा आभाव आणि अन्याय,तसेंच जगण्याच्या साधनांची व जीविताची हानी,या संकटाची मूळं व्यवस्थेतच आहेत,ही सर्वात महत्वाची सहमती. केंद्रीत व आधिकाराची उतरंड असलेली राज्य रचना,धनदांडग्या व्यापा-यांच्या हातात सूत्र,पितृसत्ता व जातीव्यवस्थेसह अन्य सर्व प्रकारच्या सामाजिक आणि सांस्कृतिक असमानता, निसर्गापासून आणि स्वत.पासून देखिल आध्यात्मिक तुटलेपण आणि ज्ञान व तंत्रज्ञानावर लोकशाही पध्दतीचे नियंत्रण नसणे हे सर्वच या व्यवस्थेचाच भाग आहेत.या सर्व मुद्यांबाबत प्रत्येकजण सहमत नसेलही.पण आपण असं सुचवतो आहोत कि,या समस्येच्या तपशीलांवर अन्यत्र चर्चा करता येईल,मात्र इथे ठोबळमानाने या संकटाच्या स्वरुपाबद्दलच्या सहमतीच्या आधारे जो मार्ग,जी दिशा आपल्याला पुढे नेणारी वाटते आहे,त्या दिशेने आपण पुढे जाऊ यात.

---

तळटीप1--हे टिपण विकल्प संगम प्रक्रियेचा भाग म्हणून विकसित होत असलेल्या संवादाकरिता तयार करण्यात आले.हा मसुदा(व्हर्शन) पहिल्या(अक्टो.2014टिंबकटु) व दुस-या (फेब्रु.2015, मदुराई)या संगमांच्या वेळी,त्या त्या वेळच्या मसुद्यांवरील आलेल्या सूचना तसेंच तोंडी आणि ई-मेलवर व्दारे मिळालेल्या प्रतिसादानुसार बदल करुन तयार झालेला आहे.प्रतिसाद व संपर्काकरिता पत्ता..आशिश कोठारी chiikothari@gmail.com.

## पर्याय म्हणजे नेमकं काय?...

प्रत्यक्ष कृती,धोरणं,प्रक्रिया,तंत्रज्ञान आणि संकल्पना किंवा चौकटी या विविध प्रकारचे पर्याय असूं शकतात.त्यांचा प्रत्यक्षात वापर होत असेल किंवा ते प्रस्ताव असू शकतील किंवा समुहांनी,सरकारनी,सामाजिक संघटनांनी,व्यक्तिंनी अथवा सामाजिक उद्योगानी प्रचार-प्रसार केलेले असतील.

पर्याय खलील आधरस्तंभावर(अथवा एकमेकांत मिसळणा-या वर्तुळावर) रचलेले असावेत, असे आम्ही सुचवत आहोत.

**अ) पर्यावरणीय चिरायुत्व...परिसंस्था,प्रजाती(स्पेसिज्),क्रिया,चक्र या सर्वांचे व निसर्गाचे संरक्षण आणि स्थानिक ते जागतिक सर्व स्तरांवरील परिसंस्थांच्या मर्यादांचा सन्मान याचा यात समावेश आहे.**

**ब)सामाजिक स्वस्थ्य आणि न्याय....शारीरीक(भौतिक),सामाजिक,सांस्कृतिक व आध्यात्मिक दृष्ट्या परीपूर्ण व सामाधानकारक जीवन,त्यात समाज-समुहांच्या व व्यक्तिंच्या सामाजिक-आर्थिक आणि राजकिय हक्क,लाभ,अधिकार व जबाबदा-या यात समता तसेंच धार्मिक व जातीय सलोखा यांचा समावेश आहे.**

**क)थेट व प्रतिनिधिक लोकशाही.....निर्णय प्रक्रियेची सुरवात मानवी वसाहतींच्या सर्वांत लहान एककांत व्हावी,जिथे प्रत्येक व्यक्तिला सहभागाचा समान अधिकार,क्षमता व संधी असेल.या एककावर रचलेले वरील पातळीवरील प्रातिनिधिक प्रशासकिय स्तर ज्यांची जबाबदेही खालील थेट लोकशाही एककास असेल आणि जिथे निर्णय प्रक्रिया ही केवळ एक व्यक्ति एक मत,या पध्दतीने नाही तर सध्याच्या वंचित (उदा.काही अल्पसंख्यांक) घटकांच्या गरजा आणि अधिकारांचा सन्मान करणारी असेल.**

**ड)आर्थिक लोकशाही.....स्थानिक समाज-समुह आणि व्यक्ति,(ज्यात उत्पादक आणि ग्राहक,ज्यांना उत्ग्राहक असे एकत्रितपणे संबोधता येईल) यांचे उत्पादनाची साधने, वितरण,विनिमय(एक्सचेंज),बाजार यावर नियंत्रण असेल,तिथे स्थानिकिकरण हे कळीचे तत्व असेल आणि वरील स्तरावरील व्यापार व देवाणघेवाण त्यावरच आधारलेली असेल.**

**इ)सांस्कृतिक विविधता आणि ज्ञानाची लोकशाही....इथे जीवनपध्ततींच्या कल्पनाचा व**

विचारधारणांच्या वैविध्याचा आदर केला जाईल,पारंपारीक व आधुनिक..विज्ञान-तंत्रज्ञानासह सर्व ज्ञानाची निर्मिती,प्रसार आणि उपयोग याची संधी सर्वांनाच (समान) असेल.

---------------------------------------------------------------------------------

तळटीप2--इथे संस्कृतीचा अर्थ स्वत. असण्याचे व समजून घेण्याचे विविध मार्ग-भाषा, रुढी,निकष,नीती व मूल्य,जीवन व अवकाशाबद्दलची दृष्टी,जीवनपध्दती,निसर्गाशी नातं व ज्ञान

तळटीप3.....हा भाग वेबसाईटवर वापरलेल्या ठोबळ मार्गदर्शनावर आधारीत आहे,अन्य विभागांची व पैलूंची भर घालणे अर्थातच शक्य आहे.

---

सध्याचे अनेक किंवा बरेंच प्रारंभ या सर्वांची पूर्तता करत नसणार.कदाचित् आपण असा विचार करु शकू ज्यात वरीलपैकि किमान दोन गोष्टींची पूर्तता होते त्यांना आपण पर्याय मानूयात(म्हणजे जे प्रत्यक्ष हे साध्य करायला मदत करतात किंवा स्पष्ट व नि.संदेहपणे त्या दिशेने आहेत).ते इतर गोष्टींचे उलंघन करत नाहीत तर त्या बाबतीत खुले आहेत.याचा अर्थ असा कि,एखादी उत्पादन कम्पनी जर आर्थिक लोकशाही साधत असेल पण ती पर्यावरणाला पूरक नाही (व त्याची कदरच करत नाही)आणि प्रशासन व लाभांच्या वितरणात समता नाही (व त्याची कदरच करत नाही),तर त्याला पर्याय म्हणता येणार नाही.तसेंच एक चतुर तंत्रज्ञान जे ऊर्जेची बचत करते पण ते फक्त अती श्रीमंतांनाच परवडू शकेल,तर त्याला पर्याय आत्ता म्हणता येणार नाही(मात्र त्यात गरीबांकरिताचे सुध्दा तंत्रज्ञान होण्याची क्षमता आहे का? ह्याचा विचार करणे उपयोगाचे असेल).

वरील मांडणी अगदी प्रायोगिक आहे,त्यावर अधिक चर्चा आवश्यक आहे. सध्याच्या व्यवस्थेला मूलभूत पर्याय कश्याला म्हणता येईल यावरील चर्चेकरिता फक्त आधार म्हणून ही मांडणी आहे.

## विविध क्षेत्रातील पर्याय कोणते?

**समाज,संस्कृती आणि शांतता......**मानवी जीवनाचे सामाजिक व सास्कृतिक पैलू समुध्द करण्याकरिताचे प्रयत्न असे असू शकतील..

---दृष्य(चित्रकला),सादरीकरण(नृत्यनाट्य) व इतर कलां तसेंच स्थनिकांची हजारो कौशल्य, संकटातील किंवा लुप्त होत असलेल्या भाषा व अशी अनेक लक्षणें व प्रक्रिया ज्या आमच्या सांस्कृतिक विविधतेचा आणि बहुविधतेचे संरक्षण,पुनरुज्जीवन व अधिकाधिक वापर करतात.

--संघर्ष व निर्माण चळवळी ज्या विनाशकारी कृतींचा विरोध करतील,सामाजिक न्याय आणि शांततेचा आग्रह धरतील, जात,वर्ग,लिंग,वंशिक,धार्मिक व साक्षरतेवर आधारीत असमानता व असमता दूर करण्याचा प्रयत्न करतील,विविध जाती-वंश,श्रध्दा व संस्कृती मानणा-या समाज-समुहांमध्ये सुसंवाद(हारमनी),शान्ती स्थापित करतील,तसेच सध्या वंचित असलेल्या अपंग व लैंगिक अल्पसंख्याकांसह शोषित,वंचित व परिघावरच ठेवल्या गेलेल्या समुहाकरिता सन्मानाने जीवन जगण्याच्या संधी निर्माण करतील,

--नीतीमूल्यांवर आधरीत विचार व जीवन जगत,सादगी(साधेपणा),अल्पखर्चाची जीवनपध्दती, प्रमाणिकपणा व सहिष्णुता अशी मूल्य रुजविणा-या चळवळी.

धर्म,जात किंवा अन्य सामाजिक अन्याय व असमाता आणि संकुचित राष्ट्रवाद अश्या विचारांकडे कल असलेल्या प्रयत्नांना पर्याय मानले जाऊ नये.(ता.क...एक अशी सूचना आहे कि,या व पुढेही आलेल्या अश्या अस्विकृतीची विधाने वगळावीत,आपल्याया काय वाटते?)

## पर्यायी अर्थव्यवस्था आणि तंत्रज्ञान...

प्रचलित नवउदारीकरण वादी,शासनाचे वर्चस्व असलेली अर्थव्यवस्था आणि वाढीचे तत्वज्ञान याना पर्याय निर्माण करण्यास मदत करणारे प्रयत्न....

--आर्थिक उलाढाली स्थानिक असणे व त्यांचे लोकशाही नियंत्रण.

--उत्पादक आणि ग्राहक समुह(सहकार)

--स्थानिक चलन व व्यापार,पैशाशिवाय,वस्तुआधारीत विनिमय आणि भेट देणे पध्दतीची अर्थव्यवस्था.

---

--वरील स्तरावरील व्यापार व अर्थव्यवस्था व परीसंस्थेवर,तत्वांवर आधारीत.

--पर्यावरणीय दृष्ट्या संवेदनशील उत्पादने व उत्दपादन पध्दती.

--चिरायु उत्पादन निर्मिती व वापर.

--नाविन्यपूर्ण तंत्रज्ञान.

---परिसंस्थांच्या मर्यादांचा सन्मान राखणा-या ढोबळ आर्थिक संकल्पना व जी.डी.पी.— सकल घेरेलू उत्पादन,वाढ आणि अश्या संकुचित उपायांच्या व निदर्शकांच्या पलिकडे जाणारे मानवी हीत व कुशलतेकरिताचे मार्ग.

--मूलभूत सुविधा(इनफ्रास्ट्रकचर)निर्मातीसह विविध क्षोत्रांचे नियोजन व त्यांत गुंतवणूक यासाठी पर्यावर्णीय व  सामाजिक दृष्टीने पूर्वबंधित यंत्रणा.

उथळ व फसवी उत्तरे पर्याय म्हणता येणार नाहीत.जसे खोलवर रुजलेल्या सामाजिक व राजकिय समास्यांकरता,मुख्यत.बाजारी तंत्रज्ञान आधारीत उपाय किंवा प्रचलित व्यवस्थेभोवतीच गर्जना करणारे हरित-विकास प्रकारचे मार्ग.

## जीविका---जीवनमार्ग...

सन्माननीय,पर्यावरणीय दृष्टीने चिरायु आणि अर्थपूर्ण जीवनमार्ग व रोजगार...

--पारंपारीक व सामाधान देणारे, जे जे जीवनमार्ग त्या त्या समाज-समुहांनी चालू ठेवलेले आहेत त्यांची निरंतरता टिकवणे आणि उन्नती करणे...

यात शेती, पशुपालन(धनगर,गुराखी),वनआधारीत,मत्स्य व्यवसाय,कारागिरी (क्रॅंफ्टस्) असे प्राथमिक अर्थव्यवस्थेतील विविध मार्गांचा समावेश.

--उद्योग व सेवा क्षेत्रातील चिरायु व सन्माननीय रोजगार जिथे उत्पादक व सेवा देणा-यांच्या हाती त्यांच्या भवितव्याचे नियंत्रण असेल आणि मिळकतीचे वितरण समन्यायी पध्दतीने होईल.

जर पर्यावरणीय दृष्टीने चिरायु असल्याचा दावा करणारा उद्योग असेल,मग तो पारंपारीक असो कि आधुनिक,मात्र त्याचे नियंत्रण कष्टकरी नसलेल्यांकडेच असेल आणि आर्थिक किंवा राजकीय नफेखोरीमुळे कामगारांचे शोषण होत असेल तर तो बहुतेक पर्यायांच्या कक्षबाहेरच ठेवावा लागेल.

## वसाहती आणि वाहतुक...

ग्रामीण आणि शहरी विभाग (आणि त्यांना जोडणा-याही) वसाहती—वस्त्या—मानवी निवास रचना चिरायु,समतेवर आधारीत आणि रहाणे व कामकरणे याचे समाधान देणा-या करण्याचा शोध घ्यायचा तर---

--रचना चिरायु असावी आणि उपल्बध्दता सहज हवी.

--पाणी,ऊर्जा व मूलभूत सुविधांची(इनफ्रास्ट्रकचर)निर्माती स्थानिक असावी.

--जैवविविधतेचे संरक्षण करण्यात यावे.

--कचरा निर्मिती कमीत कमी असावी आणि पुनर्वापर,कार्यक्षमतेने व काटकसरीने संसाधनांचा वापर करण्यात यावा.

--सामायिक वापराच्या व मोकळ्या जागांचे संरक्षण व पुनरुज्जीवन करण्यात यावे.

--वसाहतींचे नियोजन व बजेट(मिळकत व खर्चाचा वार्षिक आराखडा) विकेंद्रीत,सहभागी पध्दतीने तयार करण्यात यावे.

--चिरायु व समतेवर आधारीत सार्वजनिक वाहतुक व्यवस्था शक्यतो (मोटर—इंधना वापराशिवायची) सर्वांना सहज उपलबध्द करुन देण्यात यावी.

--खाजगी वाहनांनी बळकावलेले क्षेत्र,सामायिक वापरा करिता प्राथमिकता आणि त्याचा सन्मान अधोरेखित करत,पुन्हा परत मिळवावे.

--वाहतुकिच्या गतीवर मर्यादा(**याबाबत खात्री?...**)

**महागडी श्रीमंती वाहने,जी कदाचित् पर्यावरण पूरक असतील पण बहुसंख्यांच्या कामाची नसतील तर ती पर्याय ठरु शाकणार नाहीत.**

## पर्यायी राजनीती...

लोककेंद्रीत प्रशासन पध्दती आणि निर्णय प्रक्रियेत थेट सहभाग या दिशेने सुरवात व प्रयत्न आणि सामाजिक व पर्यावरणिय न्यायाचे तत्व यावर आधारीत...

--ग्रामीण व शहरी विभागांत स्थानिक,अधिकारांची उतरंड नसलेली, निर्णय प्रक्रिया(थेट लोकशाही किंवा स्वराज).

--समाजातील विविध घटकांमध्ये सत्तेच्या पुनर्वाटपाची समतेवर आधरीत पध्दत (मेकॅनिझम).

--जैविक-सांस्कृतिक किंवा परिसंस्था आधारीत क्षेत्रिय पातळीवर अश्या थेट लोकशाही संस्थांची जोडणी,

--पर्यावरणीय व सांस्कृतिक दृष्टीने अधिक सलग व जोडलेली व्हावी म्हणून सध्याच्या राजकीय सीमांच्या पुनर्रचनेची कल्पना(contiguity?)

--स्थनिक पातळीवर व त्या पलिकडेही पार्टीच्या राजकारणाशिवाय निराळ्या चिंता मांडणारे गट किंवा समाज-समुह.

--ख-या लोकशहीच्या दृष्टीने पाट्र्यांमध्ये,प्रशासनांत-राज्यांत व चळवळींसह सर्व राजकीय संस्थात(ठिकाणी) असलेल्या थेट लोकशाही संस्थांच्या प्रतीनीधींनी तेथील जबाबदेही व पारदर्शकता वाढविण्याकरिताच्या कृती,

---अन्य विभागात चर्चा केलेल्या पर्यायांवर आधारीत किंवा त्यांचा पुरस्कार करणा-या धोरणात्मक चौकटींचा इथे समावेश,

--चिरायु विकास आणि समता-सामाजिक न्याय यामुळे महत्वाच्या एकछत्राखाली राजकारणातील व्यक्तींना योग्य अवकाश देणे.

## ज्ञान आमि प्रसारमाध्यमें---

समतेवर आधारीत व पर्यावरणीय दृष्टीने अधिक चिरायु जग निर्माण करण्याकरिता ज्ञानाचा वापर सक्षमीकरणाचे व सशक्तिकरणाचे साधन म्हणून करणारे प्रयत्न....

---विविध कल्पनांच्या संयोगाला आणि माहितीची देवाणघेवाण याला प्रोत्साहन देत आधुनिक व पारंपारीक, औपचारीक व अनऔपचारीक,शहरी व ग्रामीण अश्या ज्ञानक्षेत्रांच्या कक्षा ओलांडणारे,

---साधारणपणे दुर्लक्षित,दुर्गम किंवा संपर्कापलिकडचे समजल्या जाणा-या ठिकाणी माहीती घेणे मोफत व सुलभ करण्याच्या पध्दती,

---ज्ञानाला खाजगी मालकिची अथवा खाजगी नियंत्रणातील वस्तु असे होऊ देण्याऐवजी, ज्ञानाला सामायिक करणे किंवा ज्ञानाची अशी पुनर्स्थापना करणे.

---मुख्य प्रसारमाध्यमांनी दुर्लक्ष केलेले किंवा जाणीवपूर्वक दडवून टाकलेले प्रश्न मांडणारे पर्यायी माध्यमप्रयत्न हवेत,तसेंच माध्यमांना केवळ एक बाहेरचे साधन म्हणून न मानता त्यांना आपल्या कामाचा व जीवनाचा अविभाज्य भाग मानणा-या प्रक्रिया व सक्षम करणारी माहीती देण्याकरता माध्यमांचा नाविण्यपूर्ण पध्दतीं यांचा वापर करण्यात यावा.

**पर्यावरण व परिसंस्था....**परिसंस्थांची एकसंघता व त्यांच्या मर्यादांच्या तत्वांचा पुरस्कार करणारे प्रयत्न...

--स्थानिक व आधुनिक दोन्हीप्रकारच्या ज्ञानाच्या सन्मानावर आधारीत जमीन,पाणी आणि जैवविविधता यांचे विकेंद्रीत संवर्धन,पर्यावरणाला जीवनाचा आणि कामाचा अविभाज्य भाग मानत,जीवनआधारांची सांगड स्थानिक आणि प्राकृतिक दृष्य अश्या दोन्ही स्तरांवर परिसंस्थांचे पुनरुज्जीवन आणि पुनर्स्थापना यांच्याशी घालणे.

--प्रदुषण आणि वाया घालवणे याला फाटा देणे.

--निसर्गाबद्दलची समज अधिक सखोल करणे,यात सामाजिक,ऐतिहासिक आणि भूवैज्ञानिक विचारविमर्श आणि अन्य प्रजातींचे व निसर्गाचे हक्क अश्या मुद्यांचा समावेश.

**पर्यावरणीय समस्यांच्या “प्रदुषण कमी करण्याकरिता झाडे लावा” अश्या उथळ उत्तरांना पर्याय म्हणता येणार नाही.**

## ऊर्जा---

सध्याच्या केंद्रीत,पर्यावरणाचा विनाश करणा-या आणि चिरायु नसलेल्या ऊर्जा स्रोतांना पर्याय शोधण्याचे व प्रोत्साहन देणारे प्रयत्न---

--विकेंदित पुनर्वापरक्षम ऊर्जा स्रोत व मायक्रोग्रिड,

--पर्यावरणीय दृष्ट्या चिरायु ऊर्जेची समता आधारित उपलबध्दता.

--निर्मिती व वितरणाची सर्वोत्तम पातळी,अश्या निर्मिती व वितरण खर्चाची समतेवर आधारीत विभागणी,कारयक्षमतेत वाढ,सार्वजनिक संस्थांना उत्तरदायी करणे,नियोजनात ग्राहककेंद्री विचाराची रुजवात आणि मागणीवर नियंत्रण (उदा.चैनिच्या वापराकरितां)

**बहुसंख्य लोकांच्या दृष्टीने महत्वाच्या नसलेल्या महागड्या,श्रीमंती तंत्रज्ञानांना व प्रक्रियांचा पर्याय म्हणून समावेश करता येणार नाही.**

## शिकणे व शिक्षण....

ज्या शिकण्यातून व शिक्षणातून पर्यावरण व निसर्ग यांच्याशीचे नाते,स्वत.च्या समाजाशी, स्वत.च्या आतल्या आवाजाशी आणि एकंदर संपूर्ण मानवतेशीच असलेले नाते जोपासले जाते किंवा पुनर्जिवित करण्याची संधी आणि तसा अवकाश निर्माण करण्याचे प्रयत्न—

--सर्व प्रकारच्या सामुहिक व वैयक्तिक क्षमता व नाती जोपासणे,

--मुख्य प्रवाहातील संस्थानी दिलेल्या समाजापासून दूर ढकलणा-या,तुकड्यातुकड्यातील व व्यक्तीकेंद्री शिक्षणाला जाणीवपूर्वक खोडून टाकणे(पुसून टाकणे),

--औपचारीक व अनऔपचारीक,पारंपारीक व आधुनिक,स्थानिक व वैश्विक आणि तीन एच् वर आधारीत हेड-हार्ट-हँडस्(बुध्दी,मन व हात) यांचा मेळ.

--राज्य शासनासह सामाजिक संस्थाना असे शिकणे आणि शिक्षण देण्याकरिता उत्तरदायी बनविणे आमि त्यांना खाजगी संस्थांपेक्षा प्रधान्य देणे.

## आरोग्य व स्वच्छता...

सर्वांसाठी चांगले आरोग्य व आरोग्यसेवा याची खात्री देणारे प्रयत्न...

--सर्वप्रथम अनारोग्यापासून प्रतिबंध,यात पोषकअन्नाची व्यवस्था,आरोग्यदायी वातावरण इ

--ज्यांना सर्वसाधारणपणे उपचाराच्या सोयीसुविधा दिल्या जात नाही त्यांना त्या पोहचतील याबद्दल खत्री करुन घेणे,राज्यशासनाची नागरीकांप्रती जबाबदारी,त्यांना उत्तरदायी बनवून.

--पारंपारीक व आधुनिक,विविधप्रकारच्या स्वास्थ्य परंपरांचा मेळ घालणे,भारतातील व बाहेरील विविध स्वदेशी(फोक) वैद्यकीय पध्दती जसे निसर्गोपचार,आयुर्वेद,युनानी व अन्य सामायिक अथवा एकात्मिक पध्दती.

--आरोग्य सेवा व स्वच्छता व्यवस्था यांची लोकाधारीत देखरेख व नियंत्रण,आरोग्यदायी स्वच्छ परिसर राखण्याची वैयक्तिक जबाबदारी आणि मानवीमैला व अन्य कच-याचे व्यवस्थापनातील जातीआधारीत व्यवस्थापन पध्दती हटवणे.

## अन्न व पाणी...

अन्न व पाणी सुरक्षा व स्वयत्तता यासाठीचे प्रयत्न...

--सुरक्षित व पोषक अन्नाचे उत्पादन व उपलबध्दता,

--भारतीय पाकसंस्कृतीतील वैविध्य जोपसणे व स्लोफूड(फास्टफूडच्या विरुध्द)चा---ताज्या शिजवलेल्या अन्नाचा प्रचारप्रसार.

--अन्न उत्पादन व वितरणाच्या प्रक्रियांवर समाजाच्या नियंत्रणाची खात्री,

--पाण्याचा वापर व वितरण परिसंस्थेच्या(पर्यावरणाच्या)दृष्टीने चिरायु व समतेवर आधारलेले.

--विकेंद्रित संगोपन.

--पाणी ही सामायिक संपत्ती म्हणून राखणे,

--पाणी व पाणथलांचे लोकशाही पध्दतीने नियंत्रण.

**बहुतांश लोकांच्याकरता जे महत्वाचे नाहीत अश्या श्रीमंती खाण्याचे फॅड जरी ते सेंद्रीय किंवा आरोग्यदायी असले किंवा खर्चिक तंत्रज्ञानाची उत्तरे यांना पर्याय मानता येणार नाही.**

## वैश्विक नाती...

**सध्याच्या युध्दासारख्या व अती स्पर्धात्मक,प्रादेशिक राजकिय वैमनस्यांनी पेटवलेल्या अंतरराष्ट्रीय नात्याना पर्याय शोधणा-या किंवा त्यांना लक्ष बनविणा-या राज्य, समाज, नागरीकांच्या किंवा अनेकांच्या एकत्रित प्रयत्नांचा यात समावेश.**

**--राजनीतीचे उद्दीष्ट अथवा आज्ञापत्र(मॅनडेट) केवळ संकुचित राष्ट्रीय प्रधान्य नसावे तर एकत्रित चांगले जीवन असावे.**

**--सामान्य नागरीक आणि राजकारणी या दोन्ही स्तरांवर विविध राष्ट्रांमधील संवादातून ऐतिहासिक गा-हाण्यांना सामोरे जात व नाती विकसित करत विश्वास व आदर कमवावा.**

**--जागतिक स्तरावरच सैन्य,हेरगिरी व पोलिस यंत्रणेवरील खर्चात वाढ करण्यावर बंदी.**

**--एकत्रितपणे जगण्याकरिता अनेक शक्तीकेंद्रे असलेले जग आवश्यक आहे,हे ओळखणे.**

**--अमेरीका स्वत.ला अपवाद समजते किंवा चीन स्वत.ला उपजत श्रेष्ठ मानते(मध्य सामराज्य) अश्या समजूतींचा नाश.**

**--राष्ट्रराज्य संकल्पनेचे पुनर्निरीक्षण व जगातील लोकांच्या मधल्या नात्यांना महत्व देण्याचा आग्रह,स्थनिक मूळलोकांच्या समुहांच्या मतांना--मागण्याना मध्यवर्ती स्थान देणे व त्यादृष्टीने संयुक्त राष्ट्राचीच पुनर्रचना करणे.**

### इथे इतर कोणत्या विभागांची व पैलूंची यादीत भर घालावी?

---

## पर्यायांमध्ये कोणत्या तत्वांची मांडणी केली आहे?---

कृती आधारीत असोत किंवा संकल्पनात्मक,पर्यायांमध्ये मोठीच विविधता आहे.स्थानिक परिस्थितीतील वैविध्य लक्षात घेतां कुठलेच पर्याय जसेच्या तसे वापरता येणे अवघड आहे.मात्र या प्रयत्नांमंध्ये काही कळीची तत्व सर्वांमध्ये आहेत हे लक्षांत येते.इथे त्यांची एक प्राथमिक यादी देतो आहोत.

इथे आम्ही असेही नोंदवू इच्छितो कि,या तत्वांचा मूळ आधार असलेल्या आणखी मूलभूत मानवी नैतिक मूल्यांचीही यादी करता येऊ शकेल उदा.करुणा,सहानुभूती,प्रामाणिकपणा,सहीष्णुता,उदारपणा,काळजी घेणे आणि अन्य काही.हया मूल्यांचा बहुतेक सर्व आध्यात्मिक परंपरा आणि सर्व धर्म समभाव(सेक्यूलर)

मानणारे आदर करतात.म्हणून खाली उल्लेख केलेल्या तत्वांच्या चर्चेत त्याना नक्किच मध्यवर्ती मानायला हवे.

## पर्यावरणीय(परिसंस्थांची)एकात्मता आणि निसर्गाचे अधिकार...

विशेषत. वैश्विक जलचक्र(फ्रेश वॉटर सायकल) सारख्या पर्यावरणीय प्रक्रियांचे एकमेकावर अवलंबुन असणे(परस्परावलंबन),परिसंस्था आणि जैवविविधता याना पृथ्वीवरील सजीवसृष्टी करिता कळीचे महत्व आहे.

निसर्गाला आणि सर्व प्रजातींना(जंगलातील असोत किंवा पाळीव) जगण्याचा,त्यांची ज्या परिस्थितीत(वातावरणात)उत्क्रांती झाली त्यात वाढण्याचा हक्क आहे.सर्व सजीव सृष्टीचा आदर केला जावा व उत्सव साजरा व्हावा.

## समता,न्याय व समावेश....

मानवी समाजाच्या स्वास्थ्याकरिता गरजेच्या(सामाजिक-संस्कृतिक, आर्थिक, राजकीय, पर्यावरणीय आणि मानसिक) परिस्थितीत असण्याचा व समावेश होण्याचा वर्तमानात व भविष्य काळातही सर्वांना समान अधिकार आहे.अन्य कोणाही व्यक्तिच्या हक्कावर गदा न आणता, मानव आणि निसर्गातील अन्य याना समान हक्क,सर्वांनाच सामाजिक,आर्थिक व पर्यावरणीय न्याय दिल्या जावा, यात शारीरीक, मानसिक अथवा सामाजिक अक्षमतेमुळे जे सध्या वगळले जात आहेत त्यांचा समावेश करण्यावर विशेष भर असावा.

## अर्थपूर्णसहभागाचा अधिकार आणि जबाबदारी.......

प्रत्येक नागरीकाचा व समुहाचा अर्थपूर्ण सहभाग हा स्वत.च्या जगण्याबद्दलच्या निर्णयात कळीचा असतो,हा त्यांचा अधिकार आहे,तसेंच मूलभूत सहभागी लोकशाहीचा भाग म्हणून असा सहभाग घेण्याची क्षमता निर्माण होईल असे वातावरण मिळणे हा देखिल.

या हक्का बरोबरच निर्णय प्रक्रियेत, पर्यावरणीय संतुलन आणि सामाजिक-आर्थिक समता या जोड तत्वांवर आधारीत अर्थपूर्ण सहभाग घेणे ही प्रत्येक नागरीकाची व समुहाची जबाबदारी आहे,.

## विविधता आणि अनेक प्रवाह...

पर्यावरणीय संतुलन आणि समता या तत्त्वांशी जर सुसंगत असतील तर (मूळ निवासी आणि स्थानिक समुह)यांची धोरणं, मूल्य, जीवनआधार,

जगण्याच्या पध्दती,ज्ञानपरंपरा,संस्कृती,जंगली व पाळीव प्रजाती आणि जुनुकं,पर्यावरण व परिसंस्था या सर्वांच्या विविधतेतली एकात्मता मानावी.

**सार्वजनिक संसाधने आणि वैयक्तिक स्वतंत्र्याचा सन्मान---**

--सामाजिक-सांस्कृतिक, आर्थिक आणि पर्यावरणीय स्रोतांबद्दल सामुहिक व सहकार्यावर आधारित विचार व वापर (काम), वैयक्तिक स्वातंत्र्य आणि सामुहिक पालकत्व दोहोंचा आदर, तसेंच निराळेपण उदा.लैंगिक गट (स्त्री-पुरुष या शिवाय) आणि अश्या समुहातील समुहाच्या अंतरगत तसेंच अन्य समुहांशी बांधिलकी व्यक्त करण्याच्या आपुलकि व सहयोगावर आधारित नाविन्यपूर्ण पध्दती.

**लवचिकता (चिवटपणा) आणि जुळवून घेण्याची क्षमता------**

निसर्गातील बदलांना प्रतिसाद देत, जुळवून घेत पर्यावरणात टिकून रहाणे,परिस्थितीचा मान राखत, बाहेरच्या व अंतरगत बदला.च्या आधारे आणि समतेचे तत्व सांभाळत जगण्याची समाजांची आणि एकूणच मानवी समुहाची क्षमता असते.

**सवलती,स्वावलंबन आणि पर्सावरणीय क्षेत्रसीमा.....**

स्थानिक ग्रामीण व शहरी समुह, जे सर्व सदस्यांना निर्णय प्रक्रियेत सहभागी होता येईल इतपत लहान असतील, त्यांना प्रशासनाकरिताचे एकक मानावे,ते स्वास्थ्य,शिकणे-शिकवणे यासह मूलभूत गरजांच्या दृष्टीने स्वावलंबी असावेत, त्यांचे परस्परात व या मूलभूत एककांना जबाबदेही असलेल्या अन्य पातळ्यांवरील उदा.जैविक व पर्यावरणीय दृष्टीने जवळचे भाग तसेच प्रदेशिक,राष्ट्रीय व अंतरराष्ट्रीयसंस्था यांच्याशी संपर्क-संबंध असावेत. (इथे स्वावलंबी म्हणजे शक्यतो मूलभूत गरजांच्या बाबतीत स्वयंपूर्ण किंवा आत्मनिर्भर व जे स्थानिक स्तरावर उपलब्ध नाही त्याचा राज्याने (शासनाने) अधिक केंद्रीय पध्दतीने खात्रीलायक पुरवठा करावयाचा,त्या मिळण्याकरिताचा हक्क(स्वयम्-समृध्दी).

**सादगी आणि अल्पसंतुष्ट जीवन शैली......**

अती हाव न करता जगण्याकरिता व जीवनउद्योगाकरिता जे पुरेसे आहे त्यावर जगण्यात समाधन ही जगण्याची नीती.(एक परिच्छेद)

**श्रमप्रतिष्ठा आणि सृजनशीलता**.......

शारीरीक व बौध्दीक दोन्ही त-हेच्या श्रमांना समान मान, कोणतेहि काम किंवा कोणताही व्यवसाय मुळात दुस-यापेक्षा श्रेष्ठ न मानणे, हाताने कष्ट किंवा ज्याचा मोबदला दिला जात

नाही असे महिलांचे, कुटुंबाचे काम आणि काळजी घेण्याची जबाबदारी घेणे यासर्वाचा योग्य सन्मान राखणे, मात्र कोणताच व्यवसाय मुळात कुठल्याच विशिष्ठ जातीशी किंवा लिंगाशी न जोडणे,सर्वच काम सन्मानाचे,सुरक्षित आणि शोषणमुक्त असण्याची गरज, कामाचे तास कमी करणे आणि काम व आराम असा कृत्रिम भेद काढण्याचा प्रयत्न, प्रत्येकाला अधिक सृजनात्मक व्यवसायाकरता सक्षम करणे.

**अहिंसा,(सुसंवाद) एकता,शांतता……**

इतरांच्या शारीरीक, मानसिक व आध्यात्मिक स्वास्थ्याचा आदर करणारी वागणूक आणि वृत्ती.आपल्याला ज्याप्रकारे दुखावले जाऊ नये असें वाटते तसेंच इतरांना न दुखावण्याला प्रोत्साहन.आपसातीलआणि इतरांमधील एकता आणि शांती धोक्यात येईल अशी परिस्थीती बिघडू न देणे.

## अश्या पर्यायी भविष्याकडे आपल्याला नेणारी काय रणनीती असेल?----

चिरायु व समता आधारीत भविष्याकडे नेणा-या मार्गाकरिता अनेक कृती व रणनीती गरजेच्या आहेत.यात पुढील गोष्टींची समावेश असावा…

--वैयक्तिक व सामुहीक दोन्ही पातळ्यावर पर्यावरणाला धोक्याच्या,असमानता व अन्याय घडवणा-या शक्तींचा विरोध संघर्ष, सत्याग्रह व असहकार अश्या मार्गानी.

--आपली मानसिकता व दृष्टीकोण आणि संस्थांमधील वसाहतवादी प्रभाव दूर करत हक्कांची उतरंड आणि द्वीभाजन उदा.विज्ञान व अन्य ज्ञानशाखा,आधुनिक व पारंपारीक, बौध्दीक व शारीरीक कष्ट इ.काढून टाकणे.

--दलित,आदिवासी,महिला,भूमीहीन,अपंग,अल्पसंख्यांक इत्यादी सत्ताहीन,वंचित ठेवण्यात आलेल्या समुहांचे आवाज,त्यांचे म्हणणे निर्णय घेणा-या मंचांवर मांडण्यास,पोहचवण्यास मदत करणे,सहाय्यभूत होणे.

--विविध क्षेत्रात उत्तरे शोधण्याकरिताच्या सामाजिक नवीन उपक्रमांना व प्रयोगांना प्रोत्साहन देणे,प्रादेशिक स्तरावर तसेंच विशिष्ठ मुद्यांच्या पर्यायांचे गट,मंच उभारणे.

---लिंगभेद-लैंगिकता आणि अन्य पारंपारीक पूर्वग्रह व प्रवृत्तींचे प्रदर्शन, प्रचार-प्रसार करणा-यांचा तीव्र निषेध करणे(अधिक चांगले शब्दांकन शक्य..)

--वैयक्तिक आणि समुह स्तरावर अहिंसात्मक संवाद आणि कलह(वाद)यांचे निवारण व घाव भरुन काढण्याचे मार्ग वापरणे.

--निरनिराळ्या संस्कृती,विचिरप्रणाली(आयडीओलॉजी),जीवनपध्दती आणि श्रध्दा(फेथ) यात परस्पर छेद न देणारे फरक असू शकतात, असे फरक आणि विविधता याबद्दल समाजाची समज वाढवणे.

--पर्यावरणीय संतुलन (चिरायु विकास),समता व प्रमाणिकपणा याबाबतीत वैयक्तिक आयुष्यात बोले तैसा चाले पध्दतीने वागण्याची जबाबदारी,जेंव्हा असे शक्य नसेल तेंव्हा स्वत.ची सद्सद् विवेकबुध्दी आणि आपला आतील आवाज यानुसार कृती करणे,वागणे.

--ज्ञान,अनुभव,स्रोत-संसाधने आणि कौशल्य यांची समाजाकरितां देवघेव विशेषत. विनामूल्य पध्दतीने.

--विविधस्तरांवर व सतत संवाद.

--धोरणात्मक निर्णय मंच आणि न्यायव्यवस्थेसह तक्रार निवारण आणि परिवर्तन या करताच्या सर्व उपलब्ध लोकशाही मार्गांचा वापर.

--आपण खाण्याकरिता जे निवडतो त्याच्या परिणामांबद्दल आणि कोणते बदल शक्य आहेत याबाबत ग्राहक जागृती.

--सर्व प्रकारच्या राजकीय गटांशी व प्रक्रियांशी,पार्टी व पार्टी नसलेल्या दोन्हीशी,संवाद.

--परिवर्तनाचा संदेश पोहचविण्याकरिता मुख्यप्रवाहातील व पर्यायी दोन्ही प्रकारच्या माध्यमांचा वापर.

--सध्याच्या संकटांची ऐतिहासिक व व्यवस्थेतील मूळें याबद्दल सामाजिक समज वाढविणे आणि मार्ग काढण्याचा सामुहीक प्रयत्न.

--शास्त्रीय व जन-समुहांच्या अश्या दोन्ही परंपरांकडून शिकत(व  अखेर त्यामधील दरी दूर करत), तसेंच गाधी, मार्कस्, अंबेडकर, अरबिंदो, टागोर इत्यादी विचारधारा तसेंच आदिवासी-दलित यांचे जगाचे आकलन समजून घेणे.

--जगभरातील विविध लोक,जनसमुह आणि संस्कृतींना परस्परांकडून शिकणे.

--रोजच्या जगण्यात कलात्मकता आणि प्रत्येक व्यक्तीचे आणि समुहाचे जीवनात सृजनशीलता आणणे.

***या सर्वाचे एकत्रिकरण होऊन सर्वांगिण पर्यायी जगाचा दृषटीकोण बनू शकेल का?---***सध्या प्रचलित व्यवस्थेला जबरदस्त आव्हान ठरु शकेल असा जगाबद्दलचा सामायिक दृष्टिकोण आणि चौकट या शोधातून उभारता येईल का?...

या करिता आपल्याला अनेक प्रश्नांना भिडावे लागेल,त्यापैकि काही असे...

----सत्तेच्या तराजूत राज्यशासन किंवा कम्पन्या यांच्या ऐवजी आपण समाज किंवा समुहाला किती ताकदीने समोर ठेऊ शकतो?

----हजारो वर्षांमध्ये भारतात विकसित झालेल्या अश्या किती प्रचीन किंवा पुरातन पध्दती किंवा संकल्पना आहेत कि,ज्या आजही आर्थपूर्ण आहेत? त्या जातीय किंवा भांडवली(कम्पनी)शक्तींनी किती फ्रभावित होतील आणि त्यांच्या अश्या गैरवैपरातून त्यांची कितपत सुटका करुन त्यांचा सर्वसमावेशकतेकरिता उपयोग करता येईल?

---अधिक प्रभावीपणे व्यक्त केल्याजाणा-या दृष्टिकोणामुळे झाकोळल्या जाणा-या दृष्टिकोणाबद्दल आपण कसे शिकणार? स्त्रीवाद या सारख्या अन्य विशेष दृष्टिकोणांबद्दलही हाच प्रश्न आहे.

----आजच्या युवकांसह भारतातील जनतेला आपण हे अर्थपूर्ण वाटेल असे कसे करणार?भ्रष्टाचार,तृतीयपंथीयाचे हक्क अश्या काही मुद्यांवर युवक रस्त्यावर आले ...आपण त्यांना पर्याय अर्थपूर्ण वाटावे असे कसे करणार,आपण लोकांची सकारात्मक संदेश ऐकण्याची गरज कशी हाताळणार?

----अजूनही न बाटलेल्या—कुंपणावरच्या मोठ्या गटापर्यंत आपण हे मुद्दे नेऊ शकू,संवादाच्या कोणत्या भाषा आणि पध्दती वापरुयात (तोंडी,लेखी, छापील,

दृकश्राव्य)ज्या आपला संदेश कमजोर न करता अधिक प्रभावीपणे परिणाम करतील?आपल्या संदेशांत भावना आणि कारणें दोन्ही कसे आणता येईल?

---शहरी मध्यम वर्गासारख्या सध्याच्या ,बाजारी पध्दतीत खोल रुतलेल्यांना कश्याप्रकारे बदलवायचे किंवा तुलनेने चिरायु पध्दतीची जीवनशैली ज्यांनी स्विकारली आहे,त्यांना ती चालू ठेवायला व अधिक वाढवायला आपण कशी मदत करु यात?

---परिवर्तनाचे मुख्य कर्ते कोण असतील?सध्याच्या प्रचलित व्यवस्थेचा विरोध करणा-या जनचळवळींना पर्यायी भविष्याकडे त्याना वळवत कसे जोडून घ्यायचे?

---आणि सर्वांत शेवटी पण खूप महत्वाचा मुद्दा असा कि,भारतभर विखुरलेल्या, एकएकट्या मुद्यांवरच्या आणि पर्याय शोधणा-या अनेकविध संघर्षांना काही समान पातळीवर आणि दृष्टीकोणासह एकत्रित आणण्याची काय प्रक्रिया असेल?

**ह्या सर्व प्रयत्न मोठ्या राजकीय बदलाची शक्ती कसा बनू शकेल?**

---------------------------------------------------------------------------